# अपहरण झालेल्या दोघांची ग्रामीण पोलिसांनी केली सुटका

## एक आरोपी ताब्यात, तिघे फरार

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका पेट्रोल पंपासमोरून दोघांचे अपहरण केल्याची घटना ३० जुलै रोजी घडली होती. यातील अपहरण झालेल्यांची सुटका करण्यात पोलिसांना ६ तासात यश आले असले तरी यातील तीन आरोपी अद्याप फरार आहेत.

नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पेन्सलवार पेट्रोल पंपासमोरून दोघांचे अपहरण करण्यात आले होते. दरम्यान पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अपहरण करणाऱ्यांचा शोध घेण्याचे आदेश नांदेड ग्रामीण पोलिसांना दिले. त्यानुसार पोनि बाळासाहेब रोकडे यांनी अपहरण झालेल्या दोन व्यक्तीचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे फिरवत. गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अमलदारांच्या टिम तयार करुन दोन व्यक्तींचा शोध घेण्यासाठी बाहेर जिल्ह्यात पाठविण्यात आले. दरम्यान पोउपनि बाबुराव चव्हाण यांची एक टिम पुसद जि. यवतमाळ येथे गेली असता त्यांनी अपहरण झालेल्या दोन व्यक्तीना व एका आरोपीस ताब्यात घेतले. पोलीसांनी अवघ्या ६ तासामध्ये अपहरण झालेल्या दोन व्यक्तीना शोधून त्यांच्या नातेवाईकाच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान या प्रकरणात आरोपी सुनिल बंडू साबळे रा. गणेश पार्क पुसद, यास ताब्यात घेतले असून यातील पुसद तालुक्यातील रहिवासी तीन आरोपी अविनाश दत्ता मोहिते, राजू मंदाळे व विकास नरहरी खराटे हे मात्र अद्यापही फरार आहेत.

दै. लोकमत

# नांदेडातून अपहरण केलेल्या दोघांची सुखरूप सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील लातूर फाटा परिसरातून पुसद तालुक्यातील चार जणांनी नांदेडच्या दोघांचे अपहरण केले होते. ही घटना ३० जुलै रोजी घडली होती. या प्रकरणात १ ऑगस्ट रोजी गुन्हा नोंदविण्यात आल्यानंतर अवघ्या सहा तासांच्या आत अपहृत दोघांची सुटका करण्यात आली असून, अपहरण करणाऱ्या एकाला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

३० जुलै रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास लातूर फाटा येथील पेन्सलवार पेट्रोल पंपासमोरून चार जणांनी दोघांचे अपहरण केले होते. याबाबत एका महिलेने १ ऑगस्ट रोजी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर, पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली. शोधासाठी वेगवेगळ्या टीम तयार करण्यात आल्या, तसेच सायबर सेलची मदत घेण्यात आली. त्यावरून एक टीम यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे गेली होती. या ठिकाणी अपहरणकर्ता सुनील बंडू साबळे रा.गणेश पार्क काकडदाती हा पोलिसांना सापडला.